समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद लातूर
जिल्हा परिषद 20 % सेस योजना सन 2024-25

**<u>ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींसाठी सायकल पुरवठा करणे</u>**

( अनुसूचित जाती, नवबौध्द, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती,भटक्या जमाती करीता )

**अर्ज**

**प्रति,**

मा.जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद लातूर .

विषय :- ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींसाठी सायकल पुरवठा या
योजनेचा लाभ मिळणे बाबत.
मार्फत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती -----------------.

महोदय,

मी खाली सही करणार कु ---------------------------------------- रा.----------- तालुका ------------ जिल्हा लातूर येथिल रहिवासी असुन माझी जात ---------------- आहे. मी--------------------- इयत्ता---- या वर्गात शिक्षण घेत आहे. गावापासून /तांडावस्ती पासून शाळेचे अंतर ------एवढे असून मला सायकल ची आवश्यकता आहे.

तरी मला ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींसाठी सायकल पुरवठा या योजनेतून मुलींसाठी सायकल मंजुर करुन देण्यात यावे हि विनंती.

आपला/आपली विश्वासु

अर्जदाराची स्वाक्षरी
(नाव व संपुर्ण पत्ता)

## ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींसाठी सायकल पुरवठा करणे

### ग्रामसेवकांचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्रीमती ------------------------------------ मौजे ----------- ता. ---------------- जिल्हा लातूर येथिल रहिवासी असून त्या --------------------- हा व्यावसाय करतात. त्यांना यापुर्वी ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींसाठी सायकल पुरवठा या योजनेचा लाभ दिलेला नाही याची मी खात्री केलेली आहे. सदर लाभार्थी हा ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींसाठी सायकल पुरवठा या योजनेच्या लाभास पात्र आहेत. करीता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

ग्रामसेवक
(सही व शिक्का)

-------------------------------------------------------------------------------------------

### विस्तार अधिकारी यांची शिफारस

अर्जदार श्रीमती --------------------------------मौजे----------------- ता. ---------- जिल्हा लातूर येथिल रहिवासी असून त्यानी सादर केलेल्या अर्जाची व त्या सोबत जोडलेल्या प्रमाण पत्राची तपासणी केली असता ते बरोबर असल्याचे दिसून आले आहे. तरी सदर अर्जदारास ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींना सायकल पुरवठा या योजनेतून मुलींसाठी सायकल मंजूरीबाबत शिफारस करण्यात येत आहे.

विस्तार अधिकारी,
पंचायत समिती-----------.

**प्रतिस्वाक्षरीत**

गट विकास अधिकारी
पंचायत समिती--------------

## ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींसाठी सायकल पुरवठा करणे

**अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती, भटक्या जमाती व नवबौध्द प्रवर्गातील मुली शिक्षणापासून वंचित राहू नये व त्यांचे जिवनमान उंचाविणे, समाजप्रवाहात त्यांना मानाचे स्थान मिळण्याच्या उद्देशाने त्यांचा सामाजिक विकास होणेसाठी सन 2024-25 मध्ये (जि.प.सेस 20 टक्के) जिल्हा परिषद स्वसंपादित उत्पंन्नातून ग्रामिण भागातील मागासवर्गीय मुलींसाठी सायकल पुरवठा करणे हि योजना राबविण्यात येत आहे.**

योजनेचे निकष - अटी व शर्ती

1) लाभार्थी हा ग्रामीण भागातील अनुसूचित जाती/नवबौध्द घटक, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष प्रवर्ग या प्रवर्गातील असावा.
2) लाभार्थ्याने अर्जासोबत पालकांचे तहसिलदार यांचे उत्पंन्नाचे प्रमाणपत्र (उत्पंन्न मर्यादा रु.95,000/-), जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
3) लाभार्थी हा इ.8 ते इ.10 वी या वर्गात शिक्षण घेत असणे आवश्यक आहे. या करीता तांडा वस्तीवरील मुलींना प्राधान्य दयावे. तसे संबंधित मुख्याध्यापकाचे शाळेत शिक्षण घेत असलेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
4) लाभार्थीचे घरापासून शाळेचे अंतर किमान 02 कि. मि. असणे आवश्यक आहे. याबाबत संबंधित मुख्याध्यापकाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
5) सदर योजनेचा लाभ लाभार्थीस एकाच वेळी द्यावयाचा आहे त्यामुळे संबंधित लाभार्थ्याने यापुर्वी लाभ न घेतलेबाबत गट विकास अधिकारी यांनी खात्री करावी. तसेच संबंधित लाभार्थ्याकडून शपथपत्र घेण्यात यावे.
6) लाभार्थ्याने अर्जासोबत रेशन कार्ड,आधार कार्ड व बँक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.
7) निवड झालेल्या लाभार्थ्याने वस्तु खरेदी केलेली पावती जीएसटी सह असावी व वस्तु खरेदी केल्याबाबतचा ग्रामसेवक/विस्तार अधिकारी यांचा स्थळ पंचनामा व फोटो सहीत समाधानकारक अहवाल सादर करावा.
8) लाभार्थ्याने विहिती नमुन्यातील अर्ज संबंधित पंचायत समिती स्तरावर परिपूर्ण भरून सादर करणे आवश्यक आहे.

पंचायत समितीने त्यांचे स्तरावर सर्व अर्जाची तपासणी करुन परिपुर्ण अर्जाच्या नावाची यादी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे शिफारसी सह मुळ प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर निवड प्रक्रिया राबविण्यात येईल.

[टिप:- महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुद्रांक 2004/1636/प्र.क्र.436/म-1 दिनांक: 01 जुलै 2004 नुसार सर्व प्रतिज्ञापत्रावरील मुंबई मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार देय असलेले मुद्रांक शुल्क माफ केलेले असल्याने शासकीय अधिकारी यांनी प्रतिज्ञापत्र स्टॅप पेपरवर करुन आणण्याची आग्रही भुमिका न घेता सर्व प्रतिज्ञापत्रे सादर करुन घणे बंधनकार आहे असे नमुद आहे.]